# विदर्भ इंडस्ट्रीज पॉवर लिमिटेड – जनरेशन

पुढील बाबींसाठी प्रशुल्क याचिका :

*आ.व. २०१४–१५ साठी वार्षिक महसूली आवश्यकतेचे (एआरआर) सुधारित वास्तवीकरण*

*आ.व. २०१५–१६ आणि आ.व. २०१६–१७ साठी वार्षिक महसूली आवश्यकतेचा (एआरआर) मिड–टर्म(मध्यावधी) आढावा आणि वास्तवीकरण,*

*आ.व. २०१७–१८ साठी वार्षिक महसूली आवश्यकतेचे हंगामी वास्तवीकरण,*

*आ.व. २०१८–१९ आणि आ.व. २०१९–२० साठी सुधारित वार्षिक महसूली आवश्यकता आणि प्रशुल्क निश्चिती*

सादर केले गेले

## महाराष्ट्र वीज नियामक आयोग

## कार्यकारी सारांश

### १.१. ह्या प्रकरणाची तथ्ये

१.१.१. विदर्भ इंडस्ट्रीज पॉवर लिमिटेडने (व्हीआयपीएल-जी ने) महाराष्ट्र राज्यातील नागपूर जिल्ह्यात एमआयडीसी बुटीबोरी क्षेत्रात एक ६०० मेवॉ (२x३०० मेवॉ) वीजनिर्मिती केंद्र उभारले आहे, जी दि. १४.०८.२०१३ च्या एका दीर्घ मुदतीच्या वीज खरेदी करारांतर्गत (पीपीए) अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेड (एईएमएल) ला वीजपुरवठा करते जिने रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड (आरइन्फ्रा-डी) कडून वितरण व्यवसाय संपादित केलेला आहे.

१.१.२. 'व्हीआयपीएल-जी' ने ह्या आदरणीय आयोगासमोर आ.व. २०१४-१५ साठी एआरआरच्या वास्तवीकरणासाठी, आ.व. २०१५-१६ साठी एआरआरच्या हंगामी वास्तवीकरणासाठी, आणि आ.व. २०१६-१७ ते २०१९-२० ह्या तिसऱ्या नियंत्रण कालावधीसाठी बहुवर्षीय प्रशुल्क (एमवायटी) निश्चित करण्यासाठी २०१५ च्या प्रकरण क्र. ९१ अंतर्गत याचिका दाखल केली आहे. आदरणीय आयोगाने ह्या उक्त प्रकरण क्र. ९१ सन २०१५ मध्ये 'व्हीआयपीएल-जी'चे इंधन खर्चाशी संबंधित काही विशिष्ट दावे नामंजूर करताना दि. २० जून २०१६ रोजी एक आदेश पारित केला *(इतःपर ''एमवायटी आदेश'' म्हणून उल्लेखित).*

१.१.३. ह्या एमवायटी आदेशाने व्यथित होऊन 'व्हीआयपीएल-जी'ने आदरणीय अपिलीय विद्युत न्यायाधिकरणासमोर (एटीई) ह्या एमवायटी आदेशाविरुद्ध एक अपील दाखल केले आणि आदरणीय एटीई ने आपला निकाल आणि आदेश ३ नोव्हेंबर, २०१६ रोजी इंधन खर्चाच्या नामंजुरीबाबत 'व्हीआयपीएल-जी'ने केलेले अपील अंशतः मान्य केले *(इतःपर ''एटीई निर्णय'' म्हणून उल्लेखित).*

१.१.४. एटीई निर्णयानंतर 'व्हीआयपीएल-जी' ने उक्त एटीई निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी एमवायटी आदेशांतर्गत महाराष्ट्र वीज नियामक आयोग नियमने, २०१५ च्या विनियमन १०.१० अनुसार एक याचिका ८ डिसेंबर २०१६ रोजी सादर केली. तथापि ही याचिका ह्या आदरणीय आयोगापुढे प्रलंबित आहे.

१.१.५. ह्या आदरणीय आयोगाने एटीई निर्णयाविरुद्ध भारताच्या सर्वोच्च न्यायालयात अपील केले आहे. ह्या प्रकरणाचा (सीए क्र. ३७२ / २०१७ म्हणून क्रमांकित) अंतिम निपटारा होणे अजून प्रलंबित आहे.

१.१.६. एमवायटी नियमावली नियमन ८ अन्वये, व्हीआयपीएल-जी ने प्रकरण क्र.१९९/२०१७ मध्ये आदरणीय आयोगासमोर एक याचिका २१.१०.२०१७ रोजी मिड-टर्म आढाव्यासाठी सादर केली.

१.१.७. मध्यंतरीच्या काळात प्रकरण क्र. १८९ सन २०१३ आणि १४० सन २०१४ मध्ये दि. ०७.०३.२०१८ रोजी आदरणीय सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल अपील क्र. ५३९९-५४०० सन २०१६ (एनर्जी वॉचडॉग वि. सीईआरसी) (इतःपर ''एससी निर्णय'' म्हणून उल्लेखित) मध्ये परित केलेल्या निर्णयात ठरवून दिलेल्या गुणोत्तर प्रमाणानुसार ह्या आदरणीय आयोगाने एक आदेश पारित केला, ज्यामध्ये कोळशाचा पुरवठा कमी करणे तसेच कोल इंडिया लिमिटेड (सीआयएल)/ फ्युएल सप्लाय ॲग्रीमेंट्स (एफएसएज्) अंतर्गत उपकंपन्या / नवीन कोळसा वितरण धोरण, २००७ (एनसीडीपी, २००७) अंतर्गत निर्गमित आश्वासन पत्रे (एलओएज्) ज्याची परिणती प्लँटचे परिचालन प्रमाणक उपलब्धतेनुसार करण्यास इंधन पुरवठा अपुरा ठरण्यात झाली / प्लँट लोडर फॅक्टर (पीएलएफ) तसेच आश्वासन पत्रे मंजूर केल्यावरही एफएसए वर सह्या न करणे ह्या घटना 'कायद्यातील बदल' ह्या स्वरूपाच्या मानल्या गेल्या आहेत.

१.१.८. त्यानुसार व्हीआयपीएल-जी ने प्रकरण क्र. ९१ सन २०१५ मध्ये संकीर्ण अर्ज क्र. ०३ सन २०१८ आणि प्रकरण क्र. १९९ सन २०१७ मध्ये संकीर्ण अर्ज क्र. ०४ सन २०१८ हे अनुक्रमे दि ०२.०७.२०१८ आणि ०३.०७.२०१८ रोजी अतिरिक्त कारणे सादर करण्याकरिता आणि कायद्यातील बदलांतर्गत भरपाईसाठीची पद्धती मान्य करण्यासाठी विनंती करण्याकरिता विद्यमान याचिका दुरुस्त करण्यासाठी अर्ज दाखल केले आहेत.

१.१.९. ह्या आदरणीय आयोगाने आपल्या दि. १४.०९.२०१८ च्या दैनंदिन आदेशामध्ये एम.ए. क्र. ३, ४, ५ आणि ६ सन २०१८ मध्ये व्हीआयपीएल-जी ने आपल्या मिड-टर्म आढावा याचिकेमध्ये (प्रकरण क्र. १९९ सन २०१७) सिव्हिल अपील क्र. ५३९९-५४०० सन २०१६ (एनर्जी वॉचडॉग वि. सीईआरसी) मधील सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार दुरुस्ती करण्याच्या विनंत्यांना मान्यता दिली आणि व्हीआयपीएल-जी ला आ.व. २०१४-१५ करिता एआरआरच्या वास्तवीकरणासाठी सुधारित एकत्रीकृत याचिका सादर करण्याचेही आदेश दिले.

१.२. आ.व. २०१४-१५ साठी एआरआर आणि महसुली तुटीचे सुधारित वास्तवीकरण

१.२.१. आदरणीय आयोगाने एमवायटी आदेशामध्ये आ.व. २०१४-१५ साठी एआरआरच्या वास्तवीकरणास मान्यता दिली होती. तथापि, उपरोक्त दि.१४.०९.२०१८ च्या आदेशामुळे, ज्याद्वारे आदरणीय आयोगाने कायद्यातील बदलांतर्गत भरपाईचा दावा करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार एमटीआर याचिकेत बदल

करण्यास अनुमती मागणाऱ्या व्हीआयपीएल-जी च्या संकीर्ण अर्जांमध्ये केलेल्या विनंत्यांना मान्यता दिली आहे, एआरआरचे आ.व. २०१४-१५ साठीचे सुधारित वास्तवीकरण ह्याद्वारे सादर करण्यात येत आहे.

१.२.२. त्यानुसार, लेखापरीक्षित अहवाल आणि एमईआरसी एमवायटी नियमने, २०११ मध्ये निविष्ट तत्त्वे ह्यानुसार आणि एससी निर्णयात नेमून दिलेल्या गुणोत्तर प्रमाणानुसार एआरआर आणि प्रशुल्क वास्तवीकरणासाठी आ.व. २०१४-१५ साठीचा खर्च आणि उत्पन्नाचा तपशील खाली तक्त्यात दर्शविलेला आहे.

तक्ता १ : आ.व. २०१४-१५ साठी एआरआर आणि महसुली तूट वास्तवीकरण

| तपशील | आ.व. २०१४-१५ | |
|---|---|---|
| | एमवायटी आदेश | नक्त हक्कदारी |
| खर्च | | |
| एकूण इंधन संबंधी खर्च | ११५४.०५ | ११६६.२७ |
| परिचालन आणि देखभाल खर्च | १०५.०० | ७६.८६ |
| घसारा | २०३.४२ | २०३.४२ |
| दीर्घ मुदतीच्या कर्ज भांडवलावरील व्याज | २८२.०० | २८२.०० |
| खेळत्या भांडवलावरील व्याज | ७६.९२ | ३३.४२ |
| इतर खर्च | ३१.२८ | ३१.२८ |
| आय कर | ३१.७० | ३१.७० |
| एकूण खर्च (ए) | १८८४.३७ | १८२४.९४ |
| इक्विटीवरील परतावा | १७९.४९ | १७९.४९ |
| *वजा : लक्ष्य उपलब्धतेपेक्षा कमी उपलब्धतेमुळे स्थिर आकारणीतील घट* | | १.६७ |
| *अधिक: इंधन खर्चातील कार्यक्षमता लाभाच्या २/३* | | -८.१४ |
| *अधिक: ओ अँड एम खर्चातील कार्यक्षमता लाभाच्या २/३* | | १८.७६ |
| *अधिक: खेळत्या भांडवलावरील व्याजातील कार्यक्षमता लाभाच्या २/३* | | २९.०० |
| *वजा : प्रशुल्केतर उत्पन्न* | १६.६७ | १६.६७ |
| एकंदर आरओई + लाभ + प्रोत्साहक लाभ (बी) | | २००.७६ |
| महसूल | | |
| आयोगाने एमवायटी आदेशात मान्यता दिल्यानुसार | | १५७०.६५ |
| एकूण महसूल (सी) | | १५७०.६५ |
| महसुली तूट/(आधिक्य) = ((ए) + (बी))- (सी ) | | ४५५.०५ |

१.३. आ.व. २०१५-१६ साठी एआरआरचे वास्तवीकरण आणि महसुली तूट

१.३.१. लेखापरीक्षित अहवाल आणि एमईआरसी एमवायटी नियमने, २०११ मध्ये निविष्ट तत्त्वे ह्यानुसार आणि एससी निर्णयात नेमून दिलेल्या गुणोत्तर प्रमाणानुसार एआरआर आणि प्रशुल्क वास्तवीकरणासाठी आ.व. २०१५-१६ साठी खर्च आणि उत्पन्नाचा तपशील येथे सादर करण्यात येत आहे.

१.३.२. एमईआरसी (एमवायटी) नियमने, २०१५ च्या नियमन ८.२ नुसार मिड-टर्म आढाव्याचा आवाका म्हणजे प्रत्यक्ष परिचालनीय आणि आर्थिक कामगिरी व नियंत्रण कालावधीच्या पहिल्या दोन वर्षांचे मान्यताप्राप्त अंदाज आणि नियंत्रण कालावधीच्या तिसऱ्या व चौथ्या वर्षासाठीचे एआरआरचे सुधारित अंदाज, अंदाजे महसूली तूट, आणि प्रस्तावित संवर्ग-निहाय प्रशुल्क ह्यांची तुलना होय.

१.३.३. व्हीआयपीएल-जी च्या प्रत्यक्ष आणि आ.व. २०१५-१६ साठी एमवायटी आदेशात मान्यताप्राप्त परिचालनीय कामगिरीचा सारांश खालीलप्रमाणे आहे :

तक्ता २ : आ.व. २०१५-१६ साठी परिचालनीय कामगिरी

| तपशील | युओएम | व्हीआयपीएल-जी | |
|---|---|---|---|
| | | प्रमाणक कामगिरीनुसार | प्रत्यक्ष आणि लेखापरीक्षित |
| उपलब्धता | % | ८५.००% | ९७.३२% |
| पीएलएफ | % | ८५.००% | ७६.३२% |
| उष्णता दर | किकॅल/केडब्ल्यूएच | २४०१ | २४२५ |
| साहाय्यक वीज खप (आरओ प्लँट आणि डब्ल्यूपीएस वगळता) | % | ९.०० | ९.०० |
| आरओ प्लँट आणि डब्ल्यूपीएस साठी साहाय्यक वीज खप | एमयु | १.४८ | १.४८ |
| साहाय्यक वीज खप (आरओ प्लँट आणि डब्ल्यूपीएस सहित) | % | ९.०४ | ९.०४ |
| दुय्यम इंधन तेल खप | मिलि/केडब्ल्यूएच | १.०० | ०.१६ |
| एकूण निर्मिती | एमयु | ४४६८ | ४०२२ |
| नक्त निर्मिती | एमयु | ४०६४ | ३६५९ |

१.३.४. इंधन खर्च : आदरणीय सर्वोच्च न्यायालयाच्या तसेच ह्या आदरणीय आयोगाने प्रकरण क्र.१४० सन २०१३ आणि १८९ सन २०१४ मधील दिनांक ७.०३.२०१८ रोजी दिलेल्या आदेशान्वये कोळशाचा पुरवठा कमी

करणे तसेच कोल इंडिया लिमिटेड (सीआयएल)/ फ्युएल सप्लाय ॲग्रीमेंट्स (एमएसएज्) अंतर्गत उपकंपन्या / एनसीडीपी, २००७ अंतर्गत निर्गमित आश्वासन पत्रे (एलओएज्) ज्याची परिणती प्लँटचे परिचालन प्रमाणक उपलब्धतेनुसार करण्यास इंधन पुरवठा अपुरा ठरण्यात झाली / प्लँट लोडर फॅक्टर (पीएलएफ) तसेच आश्वासन पत्रे मंजूर केल्यावरही एफएसए वर सह्या न करणे ह्या घटना 'कायद्यातील बदल' ह्या स्वरूपाच्या मानल्या जात आहेत. त्यानुसार इंधन खर्चाचा हिशेब एमवायटी नियमने २०११ च्या आधारे, कायद्यातील बदलांतर्गत भरपाईचा अतिरिक्त घटकाचा परिणाम विचारात घेऊन करण्यात आलेला आहे.

त्यानुसार आ.व. २०१५-१६ मधील स्रोत-निहाय कोळसा खरेदीचा तपशील खालीलप्रमाणे आहे :

तक्ता ३ : आ.व. २०१५-१६ मधील स्रोत-निहाय कोळसा खरेदीचा तपशील

| तपशील | राशी (एमएमटी) | जीसीव्ही (फायर्ड नुसार) (किकॅल/किग्रॅ) | उतरण खर्चासहित किंमत (रु./एमटी) |
|---|---|---|---|
| आ.व. २०१५-१६ | | | |
| डब्ल्यूसीएल एफएसए कोळसा | १.१२ | ३७९४ | ३७९४ |
| ई-ऑक्शन कोळसा | ०.७४ | ३६६३ | ४०२५ |
| आयात कोळसा | ०.५८ | ४८५६ | ६१०७ |
| भारित सरासरी | २.४३ | ४००६ | ४४१३ |

१.३.५. <u>इंधन आणि पाणी ह्यांच्याशी संबंधित इतर खर्च</u> : आदरणीय आयोगाने दिलेल्या एमवायटी आदेशामध्ये रु.३८.८९ कोटी अन्य निर्मितीसंबंधित खर्च म्हणून आणि रु. ३०.४८ कोटी प्रत्यक्ष खर्च म्हणून मान्य केले होते. प्रस्तुत वास्तवीकरणासाठी तेच विचारात घेतलेले आहेत.

१.३.६. खालील तक्ता आ.व. २०१५-१६ साठी आदरणीय आयोगाने एमवायटी आदेशात मान्य केलेल्या ऊर्जा आकारणीची आणि प्रत्यक्ष ऊर्जा आकारणीची तुलना दर्शवितो :

तक्ता ४ : आ.व. २०१५-१६ साठी ऊर्जा आकारणी

| तपशील | युओएम | व्हीआयपीएल-जी | |
|---|---|---|---|
| | | एमवायटी आदेशानुसार | कायद्यातील बदल विचारात घेऊन प्रत्यक्ष |
| ऊर्जा भाराचा दर (एक्स-बस) | रु./केडब्ल्यूएच | २.११३ | ३.०३४ |
| नक्त निर्मिती | एमयु | ३६५८.८९ | ३६५८.८९ |

| | | | |
|---|---|---|---|
| एकूण इंधन खर्च | रु. कोटी | ७७३.१२ | १११०.१३ |

१.३.७. परिचालन आणि देखभाल खर्च : प्रत्यक्ष आणि लेखापरीक्षित परिचालन आणि देखभाल खर्च एमवायटी आदेशात मान्यताप्राप्त खर्चाच्या तुलनेत खाली दिलेल्या तक्त्यात दिलेला आहे, नुसार केलेला आहे. एमवायटी नियमने, २०११ अन्वये परिचालन आणि देखभाल खर्चातील लाभ ग्राहकांसमवेत सहधारित करणे आवश्यक आहे आणि उर्वरित शिल्लक व्हीआयपीएल-जी ने ठेवायची आहे.

तक्ता ५ : आ.व. २०१५-१६ साठी परिचालन आणि देखभाल खर्च

| तपशील | युनिट | एमईआरसी | व्हीआयपीएल-जी |
|---|---|---|---|
| | | एमवायटी आदेश | प्रत्यक्ष आणि लेखापरीक्षित |
| एकूण परिचालन आणि देखभाल खर्च | रु. कोटी | १११.०० | ९८.८२ |

१.३.८. अतिरिक्त भांडवलीकरण : आदरणीय आयोगाने आपल्या एमवायटी आदेशान्वये आ.व. २०१५-१६ साठी रेल्वे सायडिंगची प्रलंबित कामे, आरओ संयंत्र आणि बीटीजी व इतर सुट्या भागांचे प्रापण हाती घेण्यासाठी रु.६२.३५ कोटींच्या अतिरिक्त भांडवलीकरणाला मान्यता दिली होती. बहुतेक कामे पूर्ण झाली आहेत आणि आ.व. २०१५-१६ मध्ये रु.६२.५० कोटींचे भांडवलीकरण केले आहे. शिवाय रु.१.६६ कोटींच्या मालमत्ता निवृत्त करण्यात आल्या आहेत.

१.३.९. घसारा : घसाऱ्याचा हिशेब एकंदर लागू घसारा दरानुसार आणि आदरणीय आयोगाने मान्य केलेल्या जीएफएनुसार आणि आ.व. २०१५-१६ साठीचे प्रत्यक्ष भांडवलीकरण विचारात घेऊन करण्यात आला आहे. प्रत्यक्ष आणि लेखापरीक्षित घसारा तसेच एमवायटी आदेशात मान्यताप्राप्त घसारा ह्यांची तुलना खाली दिलेली आहे :

तक्ता ६ : आ.व. २०१५-१६ साठी घसारा

| तपशील | युनिट्स | एमवायटी आदेश | प्रत्यक्ष आणि लेखापरीक्षित |
|---|---|---|---|
| घसारा | रु. कोटी | २१६.२० | २१६.०० |

१.३.१० दीर्घ मुदतीच्या कर्जावरील व्याज आणि वित्तपुरवठा आकारणी : एमवायटी नियमावली, २०११ नुसार दीर्घ मुदतीच्या कर्जावरील व्याजाचा हिशेब करण्यात आला आहे.

तसेच प्रकरण क्र. १५० सन २०१४ मधीलदि. ३० नोव्हें २०१५ रोजी आदरणीय आयोगाने दिलेल्या आदेशाच्या आधारे संयंत्राच्या सीओडीनंतर आ.व. २०१५-१६ मध्ये खर्च कमी करण्यासाठी केलेल्या कर्जाच्या पुनर्वित्तासाठी, परकीय चलनाच्या दरातील बदलाचा (एफईआरव्ही) खर्च असे प्रत्यक्ष केलेले वित्तीय खर्च वित्तपुरवठा आकारणी अंतर्गत विचारात घेतले आहेत.

त्यानुसार आ.व. २०१५-१६ साठी दीर्घ मुदतीच्या कर्जावरील एकूण व्याज आणि वित्तपुरवठा आकारणी तसेच एमवायटी आदेशात मान्यताप्राप्त रकमांच्या तुलनेत पुढीलप्रमाणे आहेत :

तक्ता ७ : आ.व. २०१५-१६ साठी व्याज आणि वित्तपुरवठा आकारणी

| अ.क्र. | तपशील | युनिट | एमईआरसी | व्हीआयपीएल-जी |
|---|---|---|---|---|
| | | | एमवायटी आदेश | प्रत्यक्ष आणि लेखापरीक्षित |
| १ | दीर्घ मुदतीच्या कर्जावरील व्याज | रु. कोटी | ३११.७७ | २७८.२६ |
| २ | इतर वित्तीय आकारण्या | रु. कोटी | | २३.२४ |
| | एकूण | रु. कोटी | | ३०१.५० |

१.३.११ खेळत्या भांडवलावरील व्याज : एमवायटी नियमावली-२०११ तरतुदींच्या अन्वये आ.व. २०१५-१६ साठी सुधारित प्रमाणक खेळते भांडवल आवश्यकता आणि त्यावरील व्याज ह्यांचा हिशेब केला आहे. आकारण्यांची तुलना प्रत्यक्ष तसेच एमवायटी आदेशात संमत रकमांची तुलना खालील तक्त्यामध्ये दर्शविली आहे.

तसेच आयओडब्ल्यूसी हा नियंत्रणातील घटक असल्याने आयओडब्ल्यूसीमधील लाभ एमवायटी नियमन-२०११ च्या तरतुदींनुसार ग्राहकांसमवेत सहधारित करणे प्रस्तावित आहे.

तक्ता ८ : आ.व. २०१५-१६ साठी खेळत्या भांडवलावरील व्याज

| तपशील | युनिट | एमवायटी आदेश | व्हीआयपीएल-जी | |
|---|---|---|---|---|
| | | | प्रमाणक | प्रत्यक्ष |
| खेळत्या भांडवलावरील व्याज | रु. कोटी | ६१.७४ | ८६.०१ | ४७.९७ |

१.३.१२ इक्विटीवरील परतावा (आरओई) : आ.व. २०१५-१६ च्या प्रत्यक्ष आकड्यांच्या संदर्भाने आदरणीय आयोगाने संमत केलेले आरओई व हक्कदारी ह्यांची तुलना खालील तक्त्यात सादर केली आहे.

तक्ता ९ : आ.व. २०१५-१६ साठी आरओई

| तपशील | युनिट | एमईआरसी | व्हीआयपीएल-जी |
|---|---|---|---|
| | | एमवायटी आदेश | प्रमाणक |
| इक्विटीवरील उत्पन्न | रु. कोटी | २०१.७२ | २०१.७२ |

१.३.१३ आयकर : आदरणीय आयोगाने एमवायटी आदेशात आ.व. २०१५-१६ साठी रु.३१.७ कोटी इतक्या आयकरास, आ.व. २०१४-१५ साठी मंजूरी, एमवायटी आदेशात अंतिम वास्तवीकरणाच्या अधीन राहून संमती दिली होती. आ.व. २०१५-१६ साठी व्हीआयपीएल ला परतावायोग्य आयकर आणि एमवायटी आदेशात संमत केलेली रक्कम ह्यांची तुलना खालील तक्त्यात दिलेली आहे.

तक्ता १० : आ.व. २०१५-१६ साठी आयकर

| तपशील | युनिट | एमवायटी आदेश | प्रमाणक |
|---|---|---|---|
| आयकर | रु. कोटी | ३१.७० | ४४.०५ |

१.३.१४ बिगर-प्रशुल्क उत्पन्न : एमवायटी नियमावली २०११ प्रमाणकांनुसार लागू आ.व. २०१५-१६ साठी प्रत्यक्ष बिगर-प्रशुल्क उत्पन्न आणि एमवायटी आदेशान्वये संमत उत्पन्नाची तुलना खालीलप्रमाणे आहे :

तक्ता ११ : आ.व. २०१५-१६ साठी बिगर-प्रशुल्क उत्पन्न

| तपशील | युनिट | एमवायटी आदेश | प्रमाणक |
|---|---|---|---|
| बिगर-प्रशुल्क उत्पन्न | रु. कोटी | ४.२५ | ८.१९ |

१.३.१५ आ.व. २०१५-१६ साठी एआरआर चे वास्तवीकरण आणि महसूली तूट: वरील परिमाणांच्या आधारे आ.व. २०१५-१६ साठी एआरआर आणि महसूली तूट ह्यांचा सारांश खाली दिलेल्या तक्त्यानुसार आहे :

तक्ता १२ : आ.व. २०१५-१६ साठी एआरआर चा वास्तवीकरण सारांश (रु. कोटी मध्ये)

| तपशील | आ.व. २०१५-१६ | |
|---|---|---|
| | प्रमाणक | नक्त हक्कदारी |
| खर्च | | |
| एकूण इंधन संबंधी खर्च | १०७९.६५ | १०७२.३३ |
| परिचालन आणि देखभाल खर्च | १११.०० | ९८.८२ |
| घसारा | २१६.२० | २१६.०० |
| दीर्घ मुदतीच्या कर्ज भांडवलावरील व्याज | ३११.७७ | ३०१.५० |
| खेळत्या भांडवलावरील व्याज | ८६.०१ | ४७.९७ |

| तपशील | आ.व. २०१५-१६ | |
|---|---|---|
| | प्रमाणक | नक्त हक्कदारी |
| इतर खर्च | ३०.४८ | ३०.४८ |
| आय कर | ३१.७० | ४४.०५ |
| एकूण खर्च (ए) | १८६६.८१ | १८११.१५ |
| समभाग भांडवलावरील उत्पन्न | २०१.७२ | २०१.७२ |
| *अधिक: जास्त पीएलएफसाठी प्रोत्साहक लाभ* | ०.०० | ९.६० |
| *अधिक: इंधन खर्चातील कार्यक्षमता लाभाच्या २/३* | ०.०० | ४.८८ |
| *अधिक: ओ अँड एम खर्चातील कार्यक्षमता लाभाच्या २/३* | ०.०० | ८.१२ |
| *अधिक: खेळत्या भांडवलावरील व्याजातील कार्यक्षमता लाभाच्या २/३* | ०.०० | २५.३६ |
| *वजा : इतर उत्पन्न* | | ८.१९ |
| एकंदर आरओई + लाभ + प्रोत्साहक लाभ (बी) | २०१.७२ | २४१.४९ |
| महसूल | | |
| एमवायटी आदेशान्वये वीजविक्रीतून महसूल | | १७०३.३६ |
| एकूण महसूल (सी) | | १७०३.३६ |
| महसुली तूट/ (आधिक्य) = ((ए) + (बी))- (सी ) | | ३४९.२८ |

१.४ आ.व. २०१६-१७ चे एआरआर चे वास्तवीकरण आणि महसूली तूट

१.४.१ ह्याद्वारे एआरआर आणि प्रशुल्क वास्तवीकरणाच्या हेतूसाठी एमईआरसी एमवायटी नियमावली, २०१५ मध्ये निर्दिष्ट तत्त्वांच्या आणि लेखापरीक्षित लेखांच्या आधारे आणि एससी निर्णयात नेमून दिलेल्या गुणोत्तर प्रमाणानुसार आ.व. २०१६-१७ साठी खर्चाचा आणि महसूलाचा तपशील येथे सादर आहे.

१.४.२ आ.व. २०१६-१७ साठी व्हीआयपीएल-जी च्या प्रत्यक्ष आणि प्रशुल्क वास्तवीकरणासाठीच्या एमवायटी आदेशाद्वारे संमत परिचालनीय कामगिरीचा सारांश खालीलप्रमाणे आहे :

तक्ता १३ : आ.व. २०१६-१७ साठी परिचालनीय कामगिरी

| तपशील | युओएम | व्हीआयपीएल-जी | |
|---|---|---|---|
| | | एमवायटी आदेश | प्रत्यक्ष आणि लेखापरीक्षित |
| उपलब्धता | % | ८५.०० | ८८.३९ |
| पीएलएफ | % | ८५.०० | ७१.५७ |

| | | | |
|---|---|---|---|
| उष्णता दर | किकॅल/केडब्यूएच | २४०० | २३५८ |
| साहाय्यक वीज खप (आरओ प्लँट आणि डब्ल्यूपीएस सहित) | % | ९.०३ | ८.४१ |
| दुय्यम इंधन तेल खप | मिलि/केडब्ल्यूएच | ०.५० | ०.१३ |
| एकूण निर्मिती | एमयु | ४४६८ | ३७६२ |
| नक्त निर्मिती | एमयु | ४०६४ | ३४४६ |

१.४.३ इंधन खर्च : येथे वर विभाग १.३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे इंधन खर्चाचा हिशेब एमवायटी नियमने २०१५ च्या आधारे एससी निर्णयात नेमून दिलेले गुणोत्तर प्रमाण आणि कायद्यातील बदलांतर्गत भरपाईचा परिणाम विचारात घेऊन करण्यात आलेला आहे.

त्यानुसार आ.व. २०१६-१७ मध्ये केलेल्या कोळशाच्या स्रोत निहाय खरेदीचा तपशील खाली सादर केलेला आहे :

तक्ता १४ : आ.व. २०१६-१७ मधील स्रोत-निहाय कोळसा खरेदीचा तपशील

| तपशील | राशी (एम एमटी) | जीसीव्ही (फायर्ड नुसार) (केकॅल/किग्रॅ) | उतरण खर्चासहित किंमत (रु./एमटी) |
|---|---|---|---|
| आ.व. २०१६-१७ | | | |
| डब्ल्यूसीएल एफएसए कोळसा | १.२० | ३७५१ | ३७०२ |
| ई-ऑक्शन कोळसा | ०.९० | ३७२५ | ३३७० |
| आयात कोळसा | ०.२१ | ४७५४ | ५७८५ |
| भारित सरासरी | २.३१ | ३८३४ | ३७६६ |

१.४.४ इंधनाशी संबंधित इतर खर्च : व्हीआयपीएल-जी ने डब्ल्यूसीएल च्या कोळशाच्या खाणींमध्ये/पासून कोळशाच्या हाताळणीचे आणि वाहतुकीचे पर्यवेक्षण केल्याचा असा इंधनसंबंधित इतर खर्च रु.२१.४८ कोटी इतका केलेला आहे त्या तुलनेत प्रत्यक्ष खर्च रु.११.४७ कोटी आहे.

१.४.५ खालील तक्ता आदरणीय आयोगाने एमवायटी आदेशात संमत केलेल्या ऊर्जा आकारण्या आणि आ.व. २०१६-१७ मध्ये प्रत्यक्षातील ऊर्जा आकारण्या ह्यांची तुलना दर्शवितो :

तक्ता १५ : आ.व. २०१६-१७ साठी इंधन आकारणी

| तपशील | युओएम | व्हीआयपीएल-जी |
|---|---|---|

| | | एमवायटी आदेश | कायद्यातील बदल विचारात घेऊन प्रत्यक्ष |
|---|---|---|---|
| ऊर्जा भाराचा दर (एक्स–बस) | रु./केडब्ल्यूएच | २.१८१ | २.६४१ |
| प्रत्यक्ष नक्त निर्मिती | एमयु | ३४४५.७३ | ३४४५.७३ |
| एकूण इंधन खर्च | रु. कोटी | ७५१.५१ | ९१०.१४ |

१.४.६ परिचालन आणि देखभाल खर्च : प्रत्यक्ष आणि लेखापरीक्षित ओ अँड एम खर्च आणि एमवायटी आदेशात संमत केलेल्या खर्चाची तुलना खालील तक्त्यामध्ये दिलेली आहे. एमवायटी नियमने, २०१५ अनुसार परिचालन आणि देखभाल खर्चातील लाभ ग्राहकांसमवेत सहधारित करणे आवश्यक आहे आणि उर्वरित शिल्लक व्हीआयपीएल–जी ने ठेवून घ्यायची आहे.

तक्ता १६ : आ.व. २०१६–१७ साठी परिचालन आणि देखभाल खर्च

| तपशील | युनिट | एमवायटी आदेश | प्रमाणक प्रत्यक्ष |
|---|---|---|---|
| एकूण परिचालन आणि देखभाल खर्च | रु. कोटी | १३६.११ | १२९.१९ |

१.४.७ अतिरिक्त भांडवलीकरण : आदरणीय आयोगाने एमवायटी आदेशात मुख्यतः बीटीजी व इतर सुट्या भागांचे प्रापण हाती घेण्यासाठी आ.व. २०१६–१७ करिता रु.२२.७७ कोटींच्या अतिरिक्त भांडवलीकरणासाठी हंगामी मान्यता दिली होती. आ.व. २०१६–१७ मध्ये रु.१८.९६ कोटींचे भांडवलीकरण करण्यात आले आहे.

१.४.८ घसारा : घसाऱ्याचा हिशेब आदरणीय आयोगाने संमत केलेल्या एकंदर लागू दरानुसार आणि जीएफएनुसार तसेच आ.व. २०१६–१७ साठीचे प्रत्यक्ष भांडवलीकरण विचारात घेऊन केला आहे. प्रत्यक्ष आणि लेखापरीक्षित घसारा आणि एमवायटी आदेशातील मान्यता ह्यांची तुलना खाली दिलेली आहे :

तक्ता १७ : आ.व. २०१६–१७ साठी घसारा

| तपशील | युनिट्स | एमवायटी आदेश | प्रमाणक |
|---|---|---|---|
| घसारा | रु. कोटी | २१८.४४ | २१८.२६ |

१.४.९ दीर्घ मुदतीच्या कर्जावरील व्याज आणि वित्तपुरवठा आकारणी : एमवायटी नियमावली, २०१५ नुसार दीर्घ मुदतीच्या कर्जावरील व्याजाचा हिशेब करण्यात आला आहे.

पुढे असे की प्रकरण क्र. १५० सन २०१४ मधील दि. ३० नोव्हें २०१५ रोजी आदरणीय आयोगाने दिलेल्या आदेशाच्या आधारे संयंत्राच्या सीओडीनंतर आ.व. २०१६–१७ मध्ये खर्च कमी करण्यासाठी केलेल्या

कर्जाच्या पुनर्वित्तासाठी, परकीय चलनाच्या दरातील बदलाचा (एफईआरव्ही) खर्च असे प्रत्यक्ष केलेले वित्तीय खर्च वित्तपुरवठा आकारणी अंतर्गत विचारात घेतले आहेत.

त्यानुसार आ.व. २०१६–१७ साठी दीर्घ मुदतीच्या कर्जावरील व्याज आणि वित्तपुरवठा आकारणी आणि एमवायटी आदेशातील मान्यता ह्यांची तुलना खालीलप्रमाणे आहे :

तक्ता १८ : आ.व. २०१६–१७ साठी व्याज आणि वित्तपुरवठा आकारणी

| अ.क्र. | तपशील | युनिट | एमईआरसी | व्हीआयपीएल–जी |
|---|---|---|---|---|
| | | | एमवायटी आदेश | प्रत्यक्ष आणि लेखापरीक्षित |
| १ | दीर्घ मुदतीच्या कर्जावरील व्याज | रु. कोटी | २८५.४२ | २७३.९८ |
| २ | इतर वित्तीय आकारण्या | रु. कोटी | | ४.०८ |
| ३ | एफईआरव्ही | रु. कोटी | | १५.८७ |
| | एकूण | रु. कोटी | | २९३.९३ |

१.४.१० खेळत्या भांडवलावरील व्याज : एमवायटी नियमावली २०१५ च्या तरतुदींनुसार आ.व. २०१६–१७ साठी प्रमाणक खेळत्या भांडवल आवश्यकतेची सुधारित रक्कम आणि त्यावरील व्याज रक्कम हिशेबात घेतली आहे. आकारण्यांच्या रकमांची तुलना प्रत्यक्ष तसेच एमवायटी आदेशातील मान्यतांसह कशी आहे ते खालील तक्त्यात दर्शविले आहे.

तसेच, आयओडब्ल्यूसी हा नियंत्रणातील घटक असल्याने आयओडब्ल्यूसीमधील लाभ एमवायटी विनियम–२०१५ च्या तरतुदींनुसार ग्राहकांसमवेत सहधारित करणे प्रस्तावित आहे.

तक्ता १९ : आ.व. २०१६–१७ साठी खेळत्या भांडवलावरील व्याज

| तपशील | युनिट | एमवायटी आदेश | व्हीआयपीएल | |
|---|---|---|---|---|
| | | | प्रमाणक | प्रत्यक्ष |
| खेळत्या भांडवलावरील व्याज | रु. कोटी | ३७.६६ | ६०.५४ | ५३.४९ |

१.४.११ समभाग भांडवलावरील उत्पन्न (आरओई) : आ.व. २०१६–१७ च्या प्रत्यक्ष आकड्यांच्या संदर्भाने आदरणीय आयोगाने संमत केलेले आरओई खालील तक्त्यात सादर केले आहे.

तक्ता २० : आ.व. २०१६–१७ साठी आरओई

| तपशील | युनिट | एमवायटी आदेश | प्रमाणक |
|---|---|---|---|
| इक्विटीवरील उत्पन्न | रु. कोटी | २०५.१० | २०५.०९ |

१.४.१२ आयकर : आदरणीय आयोगाने एमवायटी आदेशात आ.व. २०१५-१६ साठी रु.३१.७ कोटी आयकरास, तसेच आ.व. २०१४-१५ साठी इतक्याच आयकरास, आदरणीय आयोगाने अंतिम वास्तवीकरणाच्या अधीन राहून संमती दिली होती. आ.व. २०१६-१७ साठी व्हीआयपीएल ला परतावायोग्य प्रमाणक आयकर आणि एमवायटी आदेशात संमत केलेली रक्कम ह्यांची तुलना खालील तक्त्यात दिलेली आहे.

तक्ता २१ : आ.व. २०१६-१७ साठी आयकर

| तपशील | युनिट | एमवायटी आदेश | प्रमाणक |
|---|---|---|---|
| आयकर | रु. कोटी | ३१.७० | ५८.२७ |

१.४.१३ बिगर-प्रशुल्क उत्पन्न : एमवायटी नियमावली २०१५ नुसार आ.व. २०१६-१७ साठी लागू प्रत्यक्ष बिगर-प्रशुल्क उत्पन्न आणि एमवायटी आदेशान्वये संमत उत्पन्नाची तुलना खालीलप्रमाणे आहे :

तक्ता २२ : आ.व. २०१६-१७ साठी बिगर-प्रशुल्क उत्पन्न

| तपशील | युनिट | एमवायटी आदेश | प्रत्यक्ष आणि लेखापरीक्षित |
|---|---|---|---|
| भंगाराची विक्री | रु. कोटी | ४.२५ | २.८४ |
| इतर/ संकीर्ण प्राप्ती | रु. कोटी | | ४.४८ |
| एकूण बिगर-प्रशुल्क उत्पन्न | रु. कोटी | | ७.४२ |

१.४.१४ आ.व. २०१६-१७ साठी एआरआर आणि महसूली तुटीचे वास्तवीकरण : वरील परिमाणांच्या आधारे आ.व. २०१६-१७ साठी एआरआर आणि महसूली तुटीच्या वास्तवीकरणाचा सारांश खालील तक्त्यामध्ये दिलेला आहे:

तक्ता २३ : आ.व. २०१६-१७ साठी एआरआर चा वास्तवीकरणाचा सारांश (रु. कोटी मध्ये)

| तपशील | आ.व. २०१६-१७ | |
|---|---|---|
| | प्रमाणक | नक्त हक्कदारी |
| खर्च | | |
| *एकूण इंधन संबंधी खर्च* | ८९८.६६ | ८६६.७९ |
| *परिचालन आणि देखभाल खर्च* | १३६.११ | १२९.१९ |
| *घसारा* | २१८.४४ | २१८.२६ |
| *दीर्घ मुदतीच्या कर्ज भांडवलावरील व्याज* | २८५.४२ | २९३.९३ |

| तपशील | आ.व. २०१६-१७ | |
|---|---|---|
| | प्रमाणक | नक्त हक्कदारी |
| *खेळत्या भांडवलावरील व्याज* | ६०.५४ | ५३.४९ |
| *इतर खर्च* | ११.४७ | ११.४७ |
| *आय कर* | ३१.७० | ५८.२७ |
| एकूण खर्च (ए) | १६४२.३५ | १६३१.४० |
| समभाग भांडवलावरील उत्पन्न | २०५.१० | २०५.०९ |
| *अधिक: जास्तीच्या पीएलएफसाठी प्रोत्साहक लाभ* | ०.०० | ०.०० |
| *अधिक: इंधन खर्चातील कार्यक्षमता लाभाच्या १/३* | ०.०० | १०.६२ |
| *अधिक: ओ अँड एम खर्चातील कार्यक्षमता लाभाच्या १/३* | ०.०० | २.३१ |
| *अधिक: खेळत्या भांडवलावरील व्याजातील कार्यक्षमता लाभाच्या १/३* | ०.०० | २.३५ |
| *वजा : इतर उत्पन्न* | | ७.४२ |
| एकंदर आरओई + लाभ + प्रोत्साहक लाभ (बी) | २०५.१० | २१२.९५ |
| महसूल | | |
| एमवायटी आदेशानुसार वीजविक्रीतून महसूल | | १६६१.६९ |
| एकूण महसूल ('सी) | | १६६१.६९ |
| महसुली तूट/ (आधिक्य) = ((ए) + (बी))- ('सी ) | | १८२.६६ |

१.५ आ.व. २०१७-१८ साठी एआरआर आणि महसूली तूट ह्यांचे हंगामी वास्तवीकरण

१.५.१ कामगिरीची परिमाणे :

सुधारित एमटीआर याचिका आ.व. २०१७-१८ पूर्ण झाल्यावर सादर केली जात असल्याने संपूर्ण वर्षासाठीची प्रत्यक्ष परिमाणे विचारात घेण्यात आली आहेत. पुढे असे सादर निवेदन आहे की व्हीआयपीएल-जी, देशातील इतर अनेक केंद्रांप्रमाणेच आ.व. २०१७-१८ मध्ये कोळशाच्या तीव्र तुटवड्यास सामोरे जात होते ज्याचा संयंत्राच्या कामगिरीवर तीव्र परिणाम झाला आहे. आ.व. २०१७-१८ साठीची कामगिरी परिमाणे पुढीलप्रमाणे आहेत :

तक्ता २४ : आ.व. २०१७-१८ साठी परिचालनीय परिमाणे

| तपशील | युओएम | आ.व. २०१७-१८ | |
|---|---|---|---|
| | | प्रमाणक | हंगामी प्रत्यक्ष |
| उपलब्धता | % | ८५.०० | ७५.०९ |

| | | | |
|---|---|---|---|
| पीएलएफ | % | ८५.०० | ६३.०५ |
| उष्णता दर | किकॅल/केडब्यूएच | २४०० | २३५५ |
| साहाय्यक वीज खप (आरओ प्लँट आणि डब्ल्यूपीएस सहित) | % | ९.१३ | ८.२९ |
| दुय्यम इंधन तेल खप | मिलि/केडब्ल्यूएच | ०.५० | ०.११ |
| एकूण निर्मिती | एमयु | ४४६८ | ३३१४.११ |
| स्वत:ची नक्त निर्मिती | एमयु | ४०६० | ३०३९.४७ |
| द्विपार्श्विक स्रोतातून पुरविलेली वीज | एमयु | | ७४.१२ |

१.५.२ आ.व. २०१७-१८ च्या प्रशुल्काचे आणि एआरआरचे हंगामी वास्तवीकरण : आ.व. २०१७-१८ साठीच्या प्रत्यक्ष कामगिरीच्या आधारे आ.व. २०१७-१८ च्या प्रशुल्काचे आणि एआरआरचे हंगामी वास्तवीकरण संमत करण्याची आवश्यकता आहे. तसेच येथे वर विभाग १.३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे एमवायटी नियमावली २०१५ च्या आधारे एससी निर्णयात नेमून दिलेल्या गुणोत्तर प्रमाणाचा व कायद्यातील बदलांतर्गत भरपाईचा अतिरिक्त घटकाचा परिणाम विचारात घेऊन इंधन खर्चाचा हिशेब करण्यात आलेला आहे. आ.व. २०१७-१८ च्या एआरआरच्या हंगामी वास्तवीकरणाचा सारांश पुढीलप्रमाणे आहे :

तक्ता २५ : आ.व. २०१७-१८ साठीच्या एआरआर आणि महसूली तुटीचे हंगामी वास्तवीकरण (रु. कोटींमध्ये)

| तपशील | प्रमाणक | हंगामी वास्तवीकरण |
|---|---|---|
| इंधनासंबंधी खर्च | ८९६.५९ | ८९६.५९ |
| परिचालन आणि देखभाल खर्च | १४१.९९ | १३४.३८ |
| घसारा खर्च | २१९.०५ | २१९.२२ |
| दीर्घ मुदतीच्या कर्ज भांडवलावरील व्याज | २७०.०९ | २६४.३८ |
| खेळत्या भांडवलावरील व्याज | ५४.२९ | ६४.९४ |
| इतर खर्च - इंधन | २२.५५ | १७.६८ |
| आयकर | ३१.७० | ५८.२७ |
| एकूण महसूली खर्च | १६३६.२६ | १६५५.४६ |
| अधिक: समभाग भांडवलावरील उत्पन्न | २०५.६२ | २०५.६७ |
| वजा : लक्ष्य उपलब्धतेपेक्षा कमी उपलब्धतेमुळे स्थिर आकारण्यांमधील घट | | १११.३० |
| वजा: बिगर-प्रशुल्क उत्पन्न | ४.२५ | ४.९४ |
| एकूण महसूली आवश्यकता | १८३७.६३ | १७४४.८९ |
| महसूल | | |
| एमवायटी आदेशानुसार वीजविक्रीतून महसूल | | १४७६.११ |
| एकूण महसुली तूट/ (आधिक्य) | | २६८.७७ |

१.६ आ.व. २०१८-१९ आणि आ.व. २०१९-२० साठी सुधारित प्रक्षेपित एआरआर आणि प्रशुल्क

१.६.१ उपलब्धता आणि निर्मिती योजनेची प्रक्षेपणे : एमवायटी आदेशान्वये, आ.व. २०१८-१९ आणि आ.व. २०१९-२० साठी परिचालनीय परिणामे खालीलप्रमाणे प्रक्षेपणे आहेत.

तक्ता २६ : आ.व. २०१८-१९ आणि आ.व. २०१९-२० साठी परिचालनीय परिमाणे

| तपशील | युओएम | व्हीआयपीएल-जी | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | आ.व. २०१८-१९ | | आ.व. २०१९-२० | |
| | | एमवायटी आदेश | सुधारित प्रक्षेपण | एमवायटी आदेश | सुधारित प्रक्षेपण |
| उपलब्धता | % | ८५.०० | ८५.०० | ८५.०० | ८५.०० |
| पीएलएफ | % | ८५.०० | ८५.०० | ८५.०० | ८५.०० |
| उष्णता दर | किकॅल/ केडब्ल्यूएच | २४०० | २४०० | २४०० | २४०० |
| साहाय्यक वीज खप (आरओ प्लँट आणि डब्ल्यूपीएस सहित) | % | ९.१३ | ९.१३ | ९.१३ | ९.१३ |
| दुय्यम इंधन तेल खप | मिलि/ केडब्ल्यूएच | ०.५० | ०.५० | ०.५० | ०.५० |
| एकूण निर्मिती | एमयु | ४४६७.६० | ४४६७.६० | ४४७९.८४ | ४४७९.८४ |
| नक्त निर्मिती | एमयु | ४०५९.७२ | ४०५९.७२ | ४०७०.८६ | ४०७०.८६ |

१.६.२ कोळशाचा खर्च आणि जीसीव्ही : व्हीआयपीएल-जी निवेदन करीत आहे की तिने आदरणीय दिल्ली उच्च न्यायालयात युनिट १ साठी एफएसए वर सह्या करण्यासाठी एक याचिका दाखल केली आहे. परिणामतः, आदरणीय उच्च न्यायालयाने दि. ३१.०१.२०१८ आणि ०७.०३.२०१८ च्या आपल्या अंतरिम आदेशांमध्ये सीआयएल ला अधिसूचित किंमतीला कोळशाचा पुरवठा सुरू करण्याचे आदेश दिले आहेत. तथापि उक्त आदेशाची अंमलबजावणी प्रलंबित आहे आणि सीआयएल आणि एमओसी ह्यांनी दिल्ली उच्च न्यायालयाच्या खंड न्यायपीठासमोर दाखल केलेल्या अपिलांच्या निर्णयाधीन आहे. म्हणून व्हीआयपीएल-जी ने युनिट १ चे परिचालन करण्याची आवश्यकता पूर्ण करण्यासाठी इतर स्रोतांकडून कोळशाचे प्रापण सुरू केले आहे आणि एमवायटी नियमावली, २०१५ च्या आधारे वैध आणि विद्यमान एलओए अंतर्गत कोळशाच्या पुरवठ्याबाबत आश्वासन प्रलंबित असल्याने एफएसएच्या अनुपस्थितीत प्रत्यक्ष कोळशाच्या खर्चासाठी एससी निर्णयात नेमून दिलेल्या मितवाटपाचा विचार करून आणि कायद्यातील बदलांतर्गत भरपाई हिशेबात घेऊन दावा

सादर करण्याचे ठरविले आहे. कोळशाचा खर्च आणि जीसीव्ही ह्यांच्यासाठी एप्रिल, मे आणि जून २०१८ साठीच्या प्रत्यक्ष खर्चाची सरासरी आधारभूत मानली आहे :

तक्ता २७: आ.व. २०१८-१९ आणि आ.व. २०१९-२० साठी प्रक्षेपित भारित सरासरी खर्च उतरण खर्चासहित आणि जीसीव्ही

| तपशील | राशी (एमएमटी) | जीसीव्ही (अॅज फायर्ड) (किकॅल/किग्रॅ) | उतरण खर्चासहित खर्च (रु./एमटी) |
|---|---|---|---|
| आ.व. २०१८-१९ | | | |
| खर्च अधिक कोळसा (डब्ल्यूसीएल) | १.११ | ३६६४ | ३२६५ |
| ई ऑक्शन | १.७५ | ३४६९ | ४०५८ |
| आयात कोळसा | ०.१२ | ४७४१ | ७५४१ |
| भारित सरासरी | २.९८ | ३५९३ | ३९०३ |
| आ.व. २०१९-२० | | | |
| खर्च अधिक कोळसा (डब्ल्यूसीएल) | १.११ | ३६६४ | ३२६५ |
| ई ऑक्शन | १.७६ | ३४६९ | ४०५८ |
| आयात कोळसा | ०.१२ | ४७४१ | ७५४१ |
| भारित सरासरी | २.९९ | ३५९३ | ३९०३ |

१.६.३ वरील तत्त्वांच्या आधारे आ.व. २०१८-१९ आणि आ.व. २०१९-२० साठी एआरआर आणि प्रशुल्क खालीलप्रमाणे आहेत.

तक्ता २८ : आ.व. २०१८-१९ आणि आ.व. २०१९-२० साठी एकंदर महसूली आवश्यकता (रु. कोटींमध्ये)

| तपशील | युओएम | आ.व. २०१८-१९ | | आ.व. २०१९-२० | |
|---|---|---|---|---|---|
| | | मान्यताप्राप्त | सुधारित अंदाज | मान्यताप्राप्त | सुधारित अंदाज |
| इंधनसंबंधी खर्च | रु. कोटी | ८८७.५० | ११७२.७० | ८९१.०५ | ११७६.१६ |
| इतर खर्च | रु. कोटी | २३.६८ | २३.६८ | २४.८६ | २४.८६ |
| परिचालन आणि देखभाल खर्च | रु. कोटी | १४८.१७ | १४८.१७ | १५४.७१ | १५४.४९ |
| घसारा | रु. कोटी | २१९.०५ | २१९.३७ | २१९.०५ | २१९.३७ |
| दीर्घकालीन कर्ज भांडवलावरील व्याज | रु. कोटी | २५४.०१ | २५१.७६ | २३९.०८ | २३५.८८ |
| खेळत्या भांडवलावरील व्याज | रु. कोटी | ३७.५९ | ६५.१५ | ३२.५३ | ६५.२० |
| आयकर | रु. कोटी | ३१.७० | ५८.२७ | ३१.७० | ५८.२७ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| एकूण महसूली खर्च | रु. कोटी | १६०१.७० | १९३९.११ | १५९२.९८ | १९३४.२३ |
| *अधिक : समभाग भांडवलावरील उत्पन्न* | रु. कोटी | २०५.६२ | २०५.८१ | २०५.६२ | २०५.८१ |
| वजा : बिगर प्रशुल्क उत्पन्न | रु. कोटी | ४.२५ | ४.९४ | ४.२५ | ४.९४ |
| आ.व. १५-१६ आणि आ.व. १६-१७ आणि आ.व. १७-१८ साठी महसूली तूट | रु. कोटी | | १२५५.७६ | | |
| एकंदर महसूली आवश्यकता | रु. कोटी | १८०३.०७ | ३३९५.७४ | १७९४.३५ | २१३५.१० |

त्यानुसार, आ.व. २०१८-१९ आणि आ.व. २०१९-२० साठी सुधारित स्थिर खर्च आणि ऊर्जा आकारणी खालील तक्त्यात दर्शविण्यात आली आहे :

तक्ता २९ : आ.व. २०१८-१९ आणि आ.व. २०१९-२० साठी क्षमता (स्थिर) आकारण्या आणि ऊर्जा आकारणी दर एक्स-बस

| तपशील | युओएम | आ.व. १८-१९ | | आ.व. १९-२० | |
|---|---|---|---|---|---|
| | | मान्यताप्राप्त | सुधारित प्रक्षेपण | मान्यताप्राप्त | सुधारित प्रक्षेपण |
| एकूण वार्षिक स्थिर आकारण्या | रु. कोटी | ९१५.५७ | ९४३.६० | ९०३.३० | ९३४.०९ |
| दरमहा स्थिर आकारण्या | रु. कोटी | ७६.३० | ७८.६३ | ७५.२७ | ७७.८४ |
| वार्षिक ऊर्जा आकारणी | रु. कोटी | ८८७.५० | ११९६.३८ | ८९१.०५ | १२०१.०२ |
| ऊर्जा आकारणीचा दर | रु./केडब्ल्यूएच | २.१९ | २.९५ | २.१९ | २.९५ |

१.७ प्रार्थना

व्हीआयपीएल-जी आदरणीय आयोगासमोर पुढीलप्रमाणे सन्मानपूर्वक विनंती करीत आहे :

क. प्रस्तुत याचिका दाखल करून घ्यावी;

ख. ह्या याचिकेची सुनावणी तातडीने व्हावी;

ग. आ.व. २०१४-१५ साठी सुधारित एआरआर आणि महसुली तुटीस मान्यता द्यावी;

घ. आ.व. २०१५-१६, आ.व. २०१६-१७ साठी एआरआर आणि महसुली तुटीस आणि आ.व. २०१७-१८ साठी एआरआरच्या आणि महसुली तुटीच्या हंगामी वास्तवीकरणास मान्यता द्यावी;

ङ. एमवायटी नियमावली २०१५ अंतर्गत तिसऱ्या नियंत्रण कालावधीच्या आ.व. २०१८-१९ आणि आ.व. २०१९-२० साठी सुधारित वार्षिक महसूली आवश्यकतेला आणि प्रशुल्काला मान्यता द्यावी;

च. आ.व. २०१४–१५, आ.व. २०१५–१६, आ.व. २०१६–१७ आणि आ.व. २०१७–१८ साठीच्या महसूली तुटीच्या रकमा आ.व. २०१८–१९ दरम्यान मासिक बिलांद्वारे वहणावळ खर्चासह वसूल करण्याची परवानगी व्हीआयपीएल–जी ला द्यावी आणि त्यांचे अधिदान करण्याचे निर्देश एईएमएल ला द्यावेत;

छ. आदरणीय आयोगाने एआरआर आणि महसूली तूट ह्यांच्या वास्तवीकरणास मान्यता देण्यासाठी वापरलेले व्यवहार्य एक्सेल प्रारूप व्हीआयपीएल–जी ला पुरवावे;

ज. याचिकेत काही त्रुटी असतील तर त्या माफ कराव्यात आणि आदरणीय आयोगाला जी अतिरिक्त माहिती आवश्यक असेल ती नंतरच्या टप्प्यावर सादर करण्याची परवानगी याचिकादाराला द्यावी.

झ. ह्या प्रकरणाच्या परिस्थितीत योग्य वाटेल असा आदेश पारित करावा.